श्रावण सोमवार पूर्वतयारीचा आढावा

सतर्कता, स्वच्छतेकडे लक्ष देण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

त्र्यंबकेश्वर। वेळुंजे (त्र्यं)। वि. प्र./ वार्ताहर

श्रावण महिन्यात श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे भाविकांची मोठी गर्दी होते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राधाकृष्णन बी. यांनी आज आढावा बैठक घेत त्र्यंबकमधील अडचणी व त्यावरील उपाययोजना जाणून घेतल्या. श्रावणी सोमवारनिमित्त प्रशासनाने केलेल्या तयारीची माहिती जाणून घेत काय करायला हवे, याबाबत सूचना केल्या.

जिल्हाधिकारी म्हणाले, त्र्यंबकेश्वरमध्ये कुंभमेळादरम्यान काळजी आणि नियोजन केले जाते, ते नियोजन आताही करा. सर्व विभागांनी सतर्क राहावे. कुठेही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घ्या, अशा सूचना करून त्र्यंबकेश्वरचे सौंदर्य व पावित्र्य राखले पाहिजे. श्रावणी सोमवारनिमित्त कुशावर्त कुंडावर मोठी गर्दी असते. ९० टक्के भाविक दर्शन व स्नानासाठी कुशावर्तावर येतात. कुशावर्त भागात सीसीटीव्ही लावा, याबाबत मंदिर प्रशासनाला जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले. नगरपरिषदेने स्वच्छतेबाबत ठोस भूमिका घ्यावी. सर्व नियोजन कुंभमेळ्याप्रमाणे झाले पाहिजे, असेही ते म्हणाले. प्लास्टिकचा वापर करणाऱ्या भाविकांकडून दंड आकारून महत्त्वाच्या भागांमध्ये नगरपरिषदेतर्फे स्टॉल लावून जनजागृती करावी. कागदी पिशव्या भाविकांना वाटाव्या, असेही यावेळी सांगण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी राधाकृष्णन बी., नगराध्यक्ष पुरुषोत्तम लोहगावकर, उपनगराध्यक्ष स्वप्नील शेलार, गटनेते समीर पाटणकर, पोलीस अधीक्षक संजय दराडे, अप्पर पोलीस अधीक्षक विशाल गायकवाड, तहसीदार महिंद्र पवार, गटविकास अधिकारी मधुकर मुरकुटे, पोलीस निरीक्षक रवींद्रकुमार सोनवणे, प्रांताधिकारी राहुल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी चेतना केरुरे, वनविभाग आर.एफ.ओ. कैलास अहिरे, नगरसेवक विष्णू दोबाडे, त्रिवेणी तुंगार, माधवी भुजंग, सायली शिखरे, समीर वैद्य, एस.टी.चे शरद झोले व प्रत्येक विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

प्रशासनाने श्रावणी सोमवारनिमित्त कंबर कसली आहे.

महावितरण

महावितरणने भारनियमन श्रावण महिन्यात संपूर्णपणे बंद करणार असल्याचे सांगितले. वीज पोल नादुरुस्त झाले असतील तर त्यांची त्वरित दुरुस्ती करणार असल्याचे सांगण्यात आले.

आरोग्य

आरोग्य विभागाकडून चार पथके तैनात असणार आहेत. त्यात पाच डॉक्टर असणार आहेत. यामध्ये गंगा मंदिर, सापगाव, खांबाळे, अंबोली या महत्त्वाच्या ठिकाणी आरोग्य पथक राहणार असल्याचे आरोग्य विभागातर्फे सांगण्यात आले.

चारशे बसेसची व्यवस्था

एस.टी. महामंडळातर्फे चारशे बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे.

पोलीस प्रशासन

पोलीस प्रशासाने पाचही श्रावणी सोमवारचे नियोजन केले आहे. ३५० पोलीस, ७५ होमगार्ड तर १०० महिला होमगार्ड राहणार असल्याचे सांगितले. नगरपरिषद, तेली गल्ली, सिंहस्थ कुंभमेळा बसस्थानक येथे पोलीस तैनात राहणार आहेत. खांबाळे, पहिणे, तळवाडे, अंबोली या ठिकाणी प्रशासनातर्फे पार्किंग उपलब्ध करून देणार असल्याचे सांगण्यात आले.

मांसाहार, प्लास्टिक बंद

त्र्यंबकेश्वरनगरीत श्रावण काळात रविवारी व सोमवारी मांसाहार बंद राहणार आहे. याबाबत पोलीस पथक सतर्क राहून परिसरात ढाबे व हॉटेलवर छापा मारून कारवाई करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या काळात प्लास्टिकचा वापर टाळावा, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी नगरपरिषदेला दिले.

सिन्नर पं. स. सहायक लेखाधिकारी निलंबित

नाशिक । दि.११ प्रतिनिधी

लेखाविषयक कामात दिरंगाई करून लेखा परीक्षणासाठी दप्तर उपलब्ध न करून देणाऱ्या सिन्नर पंचायत समितीमधील सहायक लेखाधिकारी गौतम पवार यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

सिन्नर पंचायत समिती कार्यालयात गौतम पवार हे सहायक लेखाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. मात्र,लेखाविषयक कामकाज मुदतीत न करणे, अनुदान उपलब्ध असतानाही कर्मचाऱ्यांचे देयक पारित न करणे, विविध अशासकीय कपातीचे धनादेश मुदतीत न पाठविणे, स्थानिक निधी लेखा कार्यालयाकडील लेखा परीक्षण पथकास दप्तर उपलब्ध करून न देणे आदी विविध कामात त्यांनी दिरंगाई केली आहे. त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियमानुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नरेश गिते यांनी गौतम पवार यांना सेवेतून निलंबित केले असून, त्यांचेवर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

भुजबळ उद्यापासून सक्रीय होणार

नाशिक । दि.११ प्रतिनिधी

मुंबईतील जसलोक रूग्णालयातून माजीमंत्री छगन भुजबळ यांना घरी सोडण्यात आले आहे. सोमवार (दि.१३) पासून ते पुन्हा सक्रीय होणार असून कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेणार आहेत. तसेच राजकीय कार्यक्रमांतही ते सहभागी होणार असल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले.

मागील आठवडयात न्यायालयीन सुनावणीसाठी जात अस्तांना छातीत दुखू लागल्याने भुजबळ यांना अस्वस्थ वाटू लागले. छातीत दुखू लागल्याने त्यांना लागेचच जसलोक रूग्णालयात दाखल करण्यात येऊन त्यांच्यावर वैद्यकीय तंज्ञआंनी उपचार केले. त्यावेळी त्यांचा रक्तदाब कमी झाला होता. रक्तातील सोडीयमचे प्रमाण कमी झाल्याने त्यांना विशेष दक्षता कक्षात देखरेखीसाठी ठेवण्यात आले होते. उपचारानंतर, शुक्रवारी त्यांना रूग्णालयातून घरी सोडण्यात आले. शनिवारी (दि.११) काही राजकीय नेत्यांनी त्यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच जिल्हयातील काही कार्यकर्त्यांनी त्यांच्या भेटी घेतल्या. यात भुजबळ यांनी जिल्हयातील पाऊस, पाणी यावर विचारणा केली तसेच येवला तालुक्यातील लांबलेल्या पाऊस, दुष्काळाबाबत कार्यकर्त्यांकडे त्यांनी चौकशी केली.

सोमवारपासून ते पुन्हा सक्रीय होतील, राजकीय कार्यक्रमांना उपस्थित राहतील तसेच कार्यकर्त्यांनाही भेटणार असल्याचे सांगण्यात आले. भुजबळ यांची तब्बेत ठिक नसल्याने नाशिकमधील राष्ट्रवादी काँग्रेसचा संविधान बचाव देश बचाव मेळावा पुढे ढकलण्यात आला होता. येवला तालुक्यांसह निम्या तालुक्यांमध्ये पावसाने दडी मारल्याने दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असल्याने पुढील आठवडयात भुजबळ जिल्हा दौऱ्यावर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

बिबट्याचा दोन दिवस झोपडीत मुक्काम

चार तासांच्या प्रयत्नानंतर जेरबंद

घोटी। दि. ११ वार्ताहर

इगतपुरी तालुक्यातील पिंपळगाव मोर शिवारात एका निर्जनस्थळी असलेल्या गवताच्या झोपडीत गेल्या दोन दिवसांपासून बिबट्याने मुक्काम ठोकला होता. दरम्यान, आज सकाळी ही बाब ग्रामस्थाच्या लक्षात येताच त्यांनी वनखाते व पोलिसांना माहिती दिली. वनविभाग सेवकांनी तब्बल चार तासांच्या प्रयत्नानंतर रेस्क्यूऑपरेशन करून बिबट्या पकडला.

घोटी- भंडारदरा मार्गावर पिंपळगाव मोर शिवारातील मोराच्या डोंगर पायथ्याशी भैरवनाथ मंदिर परिसरात जंगलातील एका झोपडीत बिबट्या असल्याचे काही गुराख्यांच्या लक्षात आले. ही माहिती त्यांनी माजी सभापती संपतराव काळे यांना दिली. काळे यांनी तात्काळ घोटी पोलीस व वनविभागाला माहिती दिली. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून बिबट्या झोपडीत येत असल्याची माहिती आहे. रात्री शिकार करून दिवसा तो झोपडीत येत असल्याचे सांगण्यात आले; मात्र बिबट्या आजारी असल्याने या झोपडीत निवारा घेत असावा, असे वनविभागाकडून सांगण्यात आले. आज सकाळी बिबट्या झोपडीत असल्याचे समजताच यंत्रणेनेची धावपळ उडाली. वनविभाग परिक्षेत्र अधिकारी रमेश ढोमसे व जाधव यांनी सकाळी या ठिकाणी भेट परिस्थिती हाताळली. प्रारंभी अद्ययावत स्वबंचलित पिंजरा

आणला. त्यात हा बिबट्या शीरत नसल्याने सर्वच चिंतेत पडले. त्यानंतर रेस्क्यू पथकाला बोलावण्यात आले. या पथकाने दुपारी ३ वाजेच्या समारास भुलीचे इंजेक्शन देत जाळीच्या सहायाने बिबट्या जेरबंद केला. सुमारे चार-पाच तास ही मोहीम सुरू होती. वनविभाग सेवक गोविंद बेंडकुले, मुरलीधर निरगुडे, सय्यद यांच्यासह संतोष दोदे, धर्मराज पारधी, प्रकाश कासार, लहू सानप आदींनी या मोहीमेत सहभाग घेतला.

'तो' आजारी...

आज सकाळी पिंपळगाव मोर शिवारातील डोंगर पायथ्याशी एका झोपडीवजा कोपीत बिबट्या लपला होता. प्रारंभी तो आजारी असल्याचे जाणवले. बिबट्या दीड वर्ष वयाचा असून, तो पूर्ण वाढ झालेला आहे. त्याच्यावर पांडवलेणी येथे उपचार करून, जंगलात सोडले जाईल.

– **रमेश ढोमसे**, वनपरीक्षेत्र अधिकारी, इगतपुरी

अशासकीय सदस्यपदी विनीत मालपुरे

कळवण । महाराष्ट्र शासन शालेय

शिक्षण व क्रीडा विभाग राज्य युवा पुरस्कार योजना सुधारित निकष निश्चित करण्यास समिती गठीत करण्यात आली असून या समितीच्या अशासकीय सदस्यपदी राज्यस्तरिय युवा पुरस्कारार्थी कोठ्यातून जय योगेश्वर बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष विनीत मालपुरे यांना यांची नियुक्ती करण्यात आली. विनीत मालपुरे यांनी सामाजिक, सांस्कृतिक, युवक कल्याण, शैक्षणिक व नेहरू युवा केंद्र नाशिकच्या माध्यमातून केलेल्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांची नियुक्ती केली आहे. नाशिक विभागातून सन २०१४-१५ साठी विनीत मालपुरे यांना राज्यस्तरीय युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

दुचाकी रॅलीने वेधले लक्ष

इगतपुरी । जागतिक आदिवासी गौरव दिनानिमित्त इगतपुरी येथे विविध कार्यक्रम पार पडले. मोटारसायकल रॅलीने सर्वांचे लक्ष वेधले.

देशाच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा असणारे आदिवासी बांधव सर्वांना संस्कार आणि संस्कृती दाखवणारे दिशादर्शक आहेत. स्वातंत्र्य चळवळींसह स्वराज्यासाठी बलिदान करून देशासमोर न फेडता येणारे ऋण करून ठेवले आहे. आदिवासींचा गौरव करताना उर भरून येतो, असे प्रतिपादन आदिवासी रानकवी तुकाराम धांडे यांनी केले. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, संस्कृतीचे रक्षक आदिवासी बांधव अजूनही उपेक्षित असले तरी येणारा काळ आदिवासींचा सर्वांगीण उत्कर्ष करणारा काळ ठरेल. यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही.

जागतिक आदिवासीदिन उत्सव समिती, इगतपुरी तालुक्यातील सर्व सामाजिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने मोटार सायकल महारॅली काढण्यात आली. या जागतिक आदिवासी गौरव दिनानिमित्त इगतपुरी येथे विविध कार्यक्रम पार पडले. कार्यक्रमप्रसंगी आदिवासी महिला नृत्य, दीपनृत्य सादर करण्यात आले. यानंतर इगतपुरीच्या राजकमल सभागृहात मेळावा पार पडला. सुत्रसंचालन अंकुश तळपे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शरद बांबळे, नितीन उंबरे, अनिल गभाले, नामदेव लोहरे, तुकाराम वारघडे, सोमनाथ जोशी, विठ्ठल बांगर, रमेश वारघडे, नवनाथ लहांगे, काशिनाथ कोरडे, विशाल ठवळे आदींनी प्रयत्न केले.

४२ गावे पाणीपुरवठा योजना पाठपुराव्याने सुरू

नांदगाव । दि.११ प्रतिनिधी

४२ गावे पाणी पुरवठा योजनेकडील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे १७,५१,०००/ रुपये वीज बिल थकल्यामुळे ४२ गावे पाणी पुरवठा योजना गेल्या १२ जुलै पासून बंद पडली होती.

आमदार पंकज भुजबळ यांनी टंचाई आढावा बैठकीमध्ये हा विषय घेण्यात आला होता. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीतही आ. पंकज भुजबळ यांनी हा प्रश्न मांडला. अखेर (९ जुलै) रोजी महा. वितरण कंपनीचे अधिक्षक अभियंता दराडे यांनी सदर प्रस्ताव मंत्रालयात पाठवला. सी. ई. वाणिज्य विभागाच्या कविता घरत यांच्याकडे थकीत वीज बिलाचे हफ्ते करून द्यावे, अशी मागणी आ. भुजबळ यांनी केली. त्यानुसार प्रथम ३०% म्हणजे ५,२५०००/- रुपये भरुन, बाकी ७०% रकमेचे ४ हफ्ते २५% प्रमाणे करण्यात आले. २५ % रकमेचे ४ धनादेश देण्यात आले. त्यामुळे ही पाणीपुरवठा योजना तात्काळ चालू करण्यात आली आहे. ही योजना चालू करण्यासाठी या योजनेचे अध्यक्ष बापूसाहेब जाधव, उपाध्यक्ष अमोल देवरे, सचिव व्ही. के. ढवळे, तहसीलदार शिवकुमार आवळकंठे, गट विकास अधिकारी जगन सूर्यवंशी, विनोद शेलार, संतोष गुप्ता आदींनी परिश्रम घेतले.

शेतकरी, कामगारांच्या मागण्यांसाठी रास्तारोको

इगतपुरी । दि. ११ प्रतिनिधी

मुंबई- नाशिक महामार्गावरील टोल नाक्यावर दुपारी १ वाजता सिटूच्या वतीने शेतकरी व कामगारांच्या मागण्यांसाठी रास्तारोको करण्यात आला. यावेळी सिटूच्या वतीने नायब तहसीलदार संजय शिंदे यांना निवेदन देण्यात आले.

सिटूच्या वतीने देशभरात रास्तारोको, आंदोलने जागोजागी करण्यात आले. या धर्तीवर इगतपुरी तालुक्यात मुंबई- नाशिक महामार्गावरील टोल नाक्यावर सिटूचे जिल्हा नेते देविदास आडोळे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी व कामगारांच्या न्याय हक्कासाठी काहीकाळ आंदोलन करीत रास्तारोको करण्यात आला. शेतकऱ्यांसाठी स्वामिनाथन आयोग लागू करावा, यांसह कामगार कायद्याची कडक अंमलबजावणी करावी, कामगार विरोधी मालक धार्जिने बदल रद्द करा, समान वेतन समान शिक्षण लागू करा, ठेकेदार पद्धतीवरील कामगार कायम करा, या मागण्यांचे निवेदन निवासी नायब तहसीलदार संजय शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक पंकज भालेराव यांना देण्यात आले. यावेळी सिटूचे जिल्हा नेते कॉ. देविदास आडोळे, तालुकाध्यक्ष चंद्रकांत लाखे, शेतकरी नेते कांतीलाल गरुड, विश्वास दुभाषे, सुनील मालुंजकर, हिरामण भोर, भगवान नाठे, ज्ञानेश्वर काजळे, दत्ता राक्षे, भाऊसाहेब जाधव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

पं.स. उपसभापतीपदी सेनेच्या आशा आहेर बिनविरोध

नांदगाव । दि.११ प्रतिनिधी

नांदगाव पंचायत समिती उपसभापतीपदी शिवसेनेच्या न्यायडोंगरी पं. स. गण सदस्या आशा किशोर आहेर यांची बिनविरोध निवड झाली.

यावेळी ज्येष्ठनेते बापुसाहेब कवडे, शिवसेना जिल्हाप्रमुख सुहास कांदे, नगराध्यक्ष राजेश कवडे, कृ. उ. बा. सभापती तेज कवडे, सभापती विद्याताई पाटील, गटनेते सुभाष कुटे, माजी सभापती विलास आहेर, सुधीर देशमुख, सुमन निकम, जि. प. सदस्य रमेश बोरसे, भाऊसाहेब हिरे, मधुबाला खिराडकर, सुशीला नाईकवाडे, राजाभाऊ जगताप, गुलाब चव्हाण, विष्णू निकम, अमोल नावंदर, नंदू पाटील, प्रमोद भावड, शहराध्यक्ष सुनिल जाधव, नांदगाव तालुक्यातील शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते.

आम्हालाही जगू द्या नाटिका जिल्हास्तरावर

लोहोणेर । येथील मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेच्या जनता विद्यालयाने निंबोळा येथे झालेल्या देवळा तालुकास्तरीय विज्ञान नाट्यमहोत्सवात प्रथम क्रमांक मिळवून, घवघवीत यश मिळवले. नाशिक येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय विज्ञान नाट्य महोत्सवासाठी या नाटिकेची निवड झाली आहे. जनता विद्यालयाचे विज्ञान शिक्षक व्ही. डी. पवार व एस. बी. एखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अथर्व समुद्र, भावेश महाजन, जयेश महाजन, नीरज शेवाळे, यश आहिरे, नूतन शेवाळे, जान्हवी आहिरे, श्रावणी बच्छाव आदी विद्यार्थ्यांनी विविध भूमिका साकारत, पर्यावरण संवर्धन या विषयावर नाटिका सादर करत, हे यश प्राप्त केले. या स्पर्धेत देवळा तालुक्यातील १७ शाळांनी सहभाग घेतला होता. या यशाबद्दल मविप्र देवळा तालुका संचालक डॉ. विश्राम निकम, शालेय समिती अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य, मुख्याध्यापक आर. एच. भदाणे, पर्यवेक्षक एस. जे. उफाडे आदींनी अभिनंदन करून त्यांना जिल्हास्तरीय विज्ञान नाट्यमहोत्सवासाठी

॥ शोकसभा ॥

आपणास कळविण्यात अत्यंत दुःख होते की,

कै. नारायणराव कृष्णाजी पवार (दादा) उर्फ एन.के.पवार सर

वय ९० वर्ष यांना गुरूवार दि. ०९/०८/२०१८ रोजी सकाळी ८.०० वा. देवाज्ञा झाली. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो. त्यांची शोकसभा

स्थळ - रावसाहेब थोरात सभागृह,
के.टी.एच.एन. कॉलेजजवळ, गंगापुर रोड, नाशिक येथे
रविवार, दि. १२/०८/२०१८ रोजी सायं. ४ वा. होणार आहे.

* आपले शोकाकुल *

डॉ. अमृतराव कृष्णाजी पवार । डॉ. अभिमन्यु कृष्णाजी पवार

ॲड. संजय दादाजी पवार । डॉ. प्रदिप नारायणराव पवार । परशराम ऊखा पवार । गोपाळराव वामन पवार
रावसाहेब बाबुराव पवार । मधुकर देवराम पवार । डॉ.सौ. सुषमा रविंद्र पेडेकर । सौ. मंजुषा नितीन देसाई

समस्त पवार परिवार व मित्र परिवार

पंचक्रिया विधी- सोमवार, दि. १३/०८/२०१८ रोजी स. ९ वा. रामकुंड, नाशिक येथे होणार असून,
गंधमुक्ती विधी- श्री खिमजी भगवानदास आरोग्य भवन, गंगाघाट, जुना भाजी बाजारसमोर येथे होणार आहे.

इलाहाबाद बैंक ALLAHABAD BANK
वि श्वा स की पं र प रा
A tradition of trust

PALM ROAD, CIVIL LINES, NAGPUR-440001 Phone Nos:0712-2533255

ताबा सुचना (सांकेतीक)

रुल 8 (1) अंतर्गत सिक्यूरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स 2002

ज्याअर्थी, सिक्यारिटईजेशन आणि रकिन्स्ट्रक्शन ऑफ फाइनैंशियल असेटस एंड एनफोर्समेंट ऑफ सिक्यूरिटी इंटरेस्ट ऍक्ट 2002 च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्ता हे **अलहाबाद बैंक, सिविल लाईन शाखा - नागपूर,** चे अधिकृत अधिकारी आहे. तसेच सिक्यूरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स 2002 चे सेक्शन 13(12) च्या सोबतच वाचला जाणारे रुल 3 अंतर्गत **दिनांक 30/05/2018** ला डिमांड नोटीस देऊन **कर्जदार मेसर्स अतल टेक्सर्स** सुचनेत दर्शविलेली रक्कम **रु.3,12,87,629/39 (रु. तिन करोड बारा लाख सत्याऐंशी हजार सहाशे एकोनतिस आणि पैसे एकोणचाळीस फक्त)** त्यासोबत व्याज आणि इतर खर्च दि. 01/04/2018 पासुन सह ही सुचना प्राप्तीनंतर 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देश्याने सुधीत करत आहे.

कर्जदार/गहाणदार/जमानतदार उक्त रक्कमेची भरपाई करण्याकरीता असमर्थ सिध्द ठरल्यामुळे कर्जदार/गहाणदार/जमानतदार तसेच आम जनतेला याव्दारे सुचना देण्यात येते की, खालील दिलेल्या 13(4) सह वाचला जाणाऱ्या ऍक्ट कार्य क्र. 8 च्या अंतर्गत संपत्तीचा सांकेतीक ताबा दि. 09 ऑगस्ट 2018 ला घेतला आहे.

विशेष करून कर्जदार/गहाणदार/जमानतदार तसेच आम जनतेला या व्दारा वरील संपत्तीच्या विक्रयी काहीही घेणे देणे न करण्याकरीता जागृत केले जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे **अलहाबाद बैंक रु.3,12,87,629/39 (रु. तिन करोड बारा लाख सत्याऐंशी हजार सहाशे एकोनतिस आणि पैसे एकोणचाळीस फक्त)** दि. 01/04/2018 त्यासोबत व्याज आणि इतर खर्च सह प्रभाराधीन राहिल.

अचल संपत्ती चा विवरण

01. प्लॉट नं. 72(226.75 चौ.मी.) आणि 73(185.00 चौ.मी.) सिटी सर्व्हे नं. 121/1+2/2, मौजा - गंगापुर ता. आणि जि. नाशिक.
(प्लॉट नं. 72) ची चतुंसिमा : पुर्व : प्लॉट नं. 70 आणि 71, पश्चिम : कॉलोनी रोड, दक्षिण : प्लॉट नं. 73, उत्तर : कॉलोनी रोड,
(प्लॉट नं. 73) ची चतुंसिमा : पुर्व : प्लॉट नं. 69 आणि 70, पश्चिम : कॉलोनी रोड, दक्षिण : प्लॉट नं. 74, उत्तर : प्लॉट नं. 72,
मेसर्स अटल प्रॉस्ट्रेल प्रा. लि. त्यांच्या संचालक श्री. पंकज अटल यांच्या माध्यमातुन

दिनांक : 09/08/2018,
स्थळ : नाशिक

अधिकृत अधिकारी,
अलहाबाद बैंक

HCKK VENTURES LIMITED
(Formerly known as Shreenath Industrial Investment Company Limited)
CIN: L45100MH1983PLC263361
Regd. Office : 3 Orchid, Savarkar Nagar, Opposite Gangapur Road Police Station, Nashik- 422013, Maharashtra. **Tel:** +91 253 2342646
Email: info@hckkventures.com; **Website:** www.hckkventures.com

STATEMENT OF STANDALONE FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED JUNE 30, 2018

(₹ In Lakhs)

Sr. No.	Particulars	Quarter ended 30.06.2018	Year ended 31.03.2018	Quarter ended 30.06.2017
		Unaudited	Audited	Unaudited
1.	Total Income from Operations	4.212	-	-
2.	Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items)	(2.618)	(11.642)	(4.881)
3.	Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items)	(2.618)	(12.005)	(4.881)
4.	Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items)	(2.618)	(12.213)	(4.881)
5.	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	(2.618)	(12.213)	(4.881)
6.	Equity Share Capital	371.00	371.00	371.00
7.	Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year	78.815	81.765	93.978
8.	Earnings Per Share (of Rs.10/- each) (for continuing and discontinued operations) -			
	1. Basic (Rs.):	(0.071)	(0.329)	(0.132)
	2. Diluted (Rs.):			

Note: The above is an extract of the detailed format of Quarter ended Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarter ended Financial Results are available on the website of the Stock Exchange i.e. www.bseindia.com and the website of the Company i.e. www.hckkventures.com.

For HCKK VENTURES LIMITED
Sd/-
Harish Kanchan
Chairman and Managing Director
DIN: 00615999

Date: August 11, 2018
Place: Nashik